## दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या

## विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दिनांक ०१.०८.२०२५ च्या नोटीसीद्वारे संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवारी दि. १७.०८.२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता 'राधिका बंगला, पहिला मजला, पटवर्धन बाग, पुणे' या ठिकाणी बोलविण्यात आली होती. तसेच सकाळी १०:३० वाजल्यापासून शासन अधिकारी श्रीमती वंदना गलांडे- पाटील (प्राधिकृत अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे (०१), पुणे) यांच्या उपस्थितीत विकसक निवड प्रक्रियेला सुरुवात होऊन १२:०० ला पूर्ण झाली.

आजची विशेष सर्वसाधारण सभा संस्थेच्या पुनर्विकास कामी विकसक निवडणेकामी बोलावली आहे. आजवर संस्थेस पुनर्विकास कामी मार्गदर्शन करणारे संस्थेचे सल्लागार श्री. हर्षल कवडीकर (आर्किटेक्ट), तसेच शासन अधिकारी श्रीमती वंदना गलांडे- पाटील (प्राधिकृत अधिकारी, उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे (०१), पुणे) यांची सदर विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थिती होती. संस्थेचे सल्लागार- श्री. हर्षल कवडीकर (आर्किटेक्ट) यांनी श्रीमती वंदना गलांडे- पाटील यांची संस्थेच्या सभासदांशी ओळख करून दिली आणि सभासदांची उपस्थिती पुर्ण झालेनंतर सभेस सुरुवात केली. व सभासदांनी मतदानास प्रारंभ केला.

**विषय क्र. ०१: संस्थेच्या पुनर्विकासासंदर्भात प्राप्त झालेल्या निविदांची छाननी करून प्राप्त निविदा धारकांची गुणवत्ता, प्रतिष्ठा, अनुभव आणि स्पर्धात्मक दर इत्यादी बाबी तपासून तीन निविदा धारकांचे सभासदांसमोर दि. १२.०७.२०२५ रोजी क्रमाने सादरीकरण झाले आहे. सदर तीन निविदाधारकांपैकी एकाची संस्थेच्या इमारतींचे पुनर्विकसन करणे कामी विकसक म्हणून निवड करणे, त्याकरिता सभासदांचे मतदान घेणे.**

⇒ सदर विषय संस्थेच्या सभासदांसमोर वाचून दाखविलेनंतर श्री. हर्षल कवडीकर (आर्किटेक्ट) यांनी मतदान कसे करावी याची माहिती व सूचना दिली. सभासदांनी आपले मत मतदानाद्वारे नोंदविण्यास तद्नंतर सुरवात केली. उपस्थित एकूण ३४ सभासदांनी (प्रत्यक्ष उपस्थित ३२ व Online द्वारे ०२) आपले मत मतदानपेटीत बंदिस्त केले. मतदान झालेनंतर उपस्थित सर्व सभासदांसमोर व प्राधिकृत अधिकारी श्रीमती वंदना गलांडे- पाटील यांचेसमोर सदर मतदानपेटी उघडण्यात आली व रिकामी करण्यात आली. उपस्थित ३४ सभासदांची मते मोजण्यात आली. सर्व सभासदांसमोर मोजण्यात आलेल्या सभासदांची मते खालीलप्रमाणे जाहीर करण्यात आली-

| | मते |
|---|---|
| १. **मे. रुई यूनिवर्सल रिअल्टीज एलएलपी** (M/s. Rui Universal Realties LLP) ---- | - २६ |
| २. **मे. एस. के. फॉर्च्यून** (M/s. . S. K. Fortune) --- | - ०७ |
| ३. **मे. गंगोत्री होम्स** (M/s. Gangotree Homes) ---- | - ०० |
| ४. बाद मते ---- | - ०१ |
| | ========== |
| | **३४** |

तद्नुसार २६ मते प्राप्त होऊन **मे. रुई यूनिवर्सल रिअल्टीज एलएलपी** (M/s. Rui Universal Realties LLP) संस्थेच्या एकूण ३८ पैकी २६ सभासदांच्या बहुमताने संस्थेच्या पुनर्विकासकरिता सभासदांची पसंती असल्याचे जाहीर करण्यात आले.

**ठराव क्र. ०१: संस्थेच्या एकूण ३८ सभासदांपैकी एकूण ३४ सभासदांनी मतदान केले असून २६ सभासदांनी पसंती दिलेल्या 'मे. रुई यूनिवर्सल रिअल्टीज एलएलपी (M/s. Rui Universal Realties LLP' ला संस्थेच्या पुनर्विकास कामी विकसक म्हणून निवडण्याचा ठराव सर्व उपस्थित सभासदांनी बहुमताने पारित केला.**

**सूचक** : श्री. रवी रामचंद्र मुल्लुर

**अनुमोदक** : श्री. सुनिल वामन सामंत

**विषय क्र. ०२: विषय क्र. ०१ नुसार निवड करण्यात येणाऱ्या विकसकास इरादापत्र (Letter of Intent) देण्याकरिता इरादापत्रावर सह्या करण्याचे अधिकार संस्थेचे मा. अध्यक्ष व मा. सेक्रेटरी यांना देणे.**

**ठराव क्र. ०२: विषय क्रमांक ०२ नुसार श्री. शशांक चिंतामणी गाजरे - अध्यक्ष व श्री. गोपाळ परशुराम कुलकर्णी - सचिव यांना अधिकार देण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे.**

वरील ठराव उपस्थित ३४ पैकी २ विरोधाने संमत करण्यात आला.

**सूचक :** सौ. उज्वला विजय प्रधान

**अनुमोदक :** श्रीमती अंजली श्रीकांत करमरकर

यानंतर मा. अध्यक्ष यांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा समाप्त झाल्याचे जाहीर केले.

श्रीरामज्योती सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

श्री. शशांक चिंतामणी गाजरे (अध्यक्ष)

श्री. गोपाळ परशुराम कुलकर्णी (सचिव)